SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,
www.unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

# विद्यार्थी विकास विभाग

Dr. S. G. Ghane
Director, Students' Development
Phone – (0231) 2609175, 2609475
Email: dsw@unishivaji.ac.in

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/४३९ दि. 11 MAY 2026

प्रति,
मा. प्राचार्य /प्रमुख,
सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त शिक्षण, संस्था
मा. अधिविभागप्रमुख, सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय:— सन २०२६—२०२७ या शैक्षणिक वर्षाचे शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी अपघात/वैद्यकीय मदत निधी योजना पाठविणेबाबत.**

महोदय,/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात, आपणांस कळविण्यात येते की, महाविद्यालय किंवा विद्यापीठाच्या वतीने स्पर्धा / संशोधन कार्य / कार्यशाळा / परिषदा / शिबीर / उपक्रम / एन.एस.एस /एन.सी.सी / आविष्कार / सांस्कृतिक / क्रिडा इ. विविध कार्यक्रमामध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठामार्फत शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी अपघात/वैद्यकीय मदत निधी योजना शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून सुरू करण्यात आलेली आहे. सोबत नियमावली जोडली आहे. सदर योजनेसाठी, प्रति वर्षी, प्रति विद्यार्थी रू. २०/— इतका निधी घेण्यास विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार **शैक्षणिक वर्ष सन २०२६—२०२७ साठी आपल्या महाविद्यालयात/अधिविभागात प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्यांकडून प्रति विद्यार्थी रू. २०/— इतका अपघात/वैद्यकीय मदत निधी घेण्यात यावा व सदर जमा होणारी रक्कम संलग्नता विभागामार्फत दिलेल्या परिपत्रकामधील तारखांनुसार प्रथम सत्र संपण्यापूर्वी विद्यापीठामध्ये अंदाजपत्रकीय शिर्षक E.4 R.115 या खाती ऑनलाईन पद्धतीने भरण्यात यावी** ही विनंती.

तसेच भरलेल्या निधीची पावती व प्रवेशित विद्यार्थ्याच्या नावाची यादी या कार्यालयास त्वरीत जमा करण्यात यावी. **याबाबत आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, सदर निधी भरणे प्रत्येक महाविद्यालयास अनिवार्य आहे.**

तसेच बऱ्याच महाविद्यालयामार्फत संपूर्ण प्रवेशित विद्यार्थ्यांचा निधी भरला जात नाही. विद्यापीठामध्ये प्रती विद्यार्थी भरलेली रक्कम व महाविद्यालयामार्फत ए.आय.एस.एच.ई (A.I.S.H.E) या पोर्टलवर नमुद केलेली विद्यार्थी संख्या यामध्ये तफावत दिसून येते. त्यामुळे ए.आय.एस.एच.ई (A.I.S.H.E) च्या पोर्टलवर नमुद केलेल्या विद्यार्थी संख्येनुसार सदर निधी जमा करावयाचा आहे.

कळावे,

आपला विश्वासू
Ghane 8/5/26
संचालक
विद्यार्थी विकास

सोबत: वरीलप्रमाणे